स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी करीता सादर करावयचा शोध प्रबंधाचा स्थूल आराखडा

संशोधनाचा विषय

नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास
(निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा)

संशोधक

समता विद्यासागर भुताळे

संशोधन मार्गदर्शक

डॉ. वैजनाथ अनमुलवाड

नेट, पीएच.डी. (मराठी)

भाषा, वाङमय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट 2016

नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास

(निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा)

1. प्रस्तावना

'नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास' (निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा) हा संशोधन विषय पीएच. डी. पदवी करीता निवडला आहे. शाररिक श्रम करणाऱ्या वर्गाला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत नाही, याची कारणे शोधणारी अनेक विचारवंत होऊन गेली. मार्क्सनेतर कामगार आणि भांडवलदार अशी संकल्पना मांडून जागतिक पातळीवर असमान जीवनावर प्रकाश टाकला.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आदिवासी साहित्यातील श्रम संस्कृतीवर संशोधन करण्याचे ठरविले आहे. आदिवासी हे या भुतलावरील आद्य रहिवाशी म्हणून त्याचे 'श्रम' या शब्दाशी जवळचे नाते आहे. मानव जेव्हा अप्रगत अवस्थेत होता तेव्हा पासुन तो श्रमिक जीवन जगत आहे.

आधुनिक तंत्रज्ञाचा विकास होण्यापूर्वी भारतातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील सामाजिक व सांस्कृतिक जीवनात निसर्ग व त्याच्या विविध छटांना महत्वाचे स्थान होते. निसर्गातील विविध घटक, झाडे किंवा वनस्पती सजीव असतात. ही भावना मानव व इतर प्राण्यांना परस्परपूरक जगण्याची उर्जा पुरवीत होती. निसर्गसृष्टी सजीव असल्याच्या अद्भुत कल्पना देखील बहुतांश भागात प्रचलित होत्या. म्हणून त्या त्या भागात किंवा परिसरात निसर्गाची मनोभावे पूजा केली जायची. सबंध मानवी जीवनाच्या दृष्ठीने निसर्गातील जैवविविधतेला केवळ प्रापंचिक किंवा औपचारिक स्थान नव्हते, तर त्याच्या नियमानुसार जगण्याचे आत्मभान होते. हे आत्मभान इतरांच्या तुलनेत आदिवासींमध्ये अधिक प्रमाणावर होते. निसर्ग हा आदिवासींच्या जगण्याचा अविभाज्य अंग होता. म्हणून त्यांच्या संस्कृतीमध्ये निसर्गतत्वांच्या शक्तिशाली अस्तित्वाला आदराचे नि पावित्र्याचे स्थान होते. हे ऐतिहासिक सत्य आपल्याला मान्यच करावे लागेल. परंतु निसर्गाच्या प्राकृतिक अस्तित्वाला जेव्हापासून मानव निर्मित आधुनिक तंत्रज्ञाचा व्यावहारिक स्पर्श झाला, तेव्हापासून सृष्टीतील नैसर्गिक संसाधने हळूहळू लोप पावत गेली. परिणामी पूर्वापार चालत आलेली निसर्गावलंबी मानवतावादी जीवनसरणी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आणि साम्राज्यवादाच्या प्रभावाखाली सापडली आणि आर्थिक चक्रव्युहाच्या गुलामगिरीत खितपत पडली. एकीकडे मानवनिर्मित आधुनिक विकासाच्या तंत्रज्ञानाचं लोहचक्र गतिमान झालं, तर दुसरीकडे पारंपरिक तथा निसर्गनियमानुसार जीवन जगणारी एक

आदिम संस्कृती हवालदिल झाली. जे लोक बौद्धिक श्रमापेक्षा शारीरिक श्रमावर अधिक अवलंबून राहतात अशा लोकांचं जीवन वर्तमान यंत्रयुगानं जवळपास संपवूनच टाकलं. त्यामुळे आदिवासी व तत्सम लोकांची केवळ पोटार्थी नसलेली श्रमसंस्कृती धोक्यात आली असल्याचे सर्वत्र बोलले जाते. त्याविषयी साहित्यात उमटलेले पडसाद कसे आहेत, याविषयी शोध घेण्याचा प्रयत्न या संशोधनात करावयाचा आहे.

2. संशोधनाचे स्वरूप

हा विषय आदिवासी समाज व त्याचे जीवन चित्रित करणारा आहे. श्रम व श्रमसंस्कृती हा आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औपचारिक शिक्षणाचे लोण जंगल-पहाडापर्यंत पोचले. हजारो वर्ष शिक्षण तथा सामाजिक सुविधांपासून वंचित राहिलेला आदिवासी शिक्षणाचे महत्व जाणून ते आत्मसात करू लागला. बोलू लागला. लिहू लागला. आदिम काळापासुनच्या मुक्या भावनांना शब्द देऊ लागला. अशा प्रयत्नातूनच सर्जनशील साहित्याची निर्मिती होऊ लागली. अर्थात आदिवासींच्या आधुनिक साहित्यनिर्मितीचा स्त्रोत त्यांच्या मौखिक प्रवाहात आहे. आणि तो प्रवाह आधुनिक आदिवासी साहित्यातूनही प्रवाहमय झाल्याचे सहज लक्षात येते. इ.स. १९६० नंतरच्या अनेक साहित्यप्रवाहांपैकी आदिवासी साहित्याचा एक प्रवाह मानला जातो. या काळात उदयास आलेल्या अनेक प्रवाहांपैकी ‘आदिवासी साहित्यप्रवाह’ मानावे का ? की तोच एक स्वतंत्र व मूळ प्रवाह आहे? इ. प्रश्न अभ्यासकांमध्ये अधूनमधून उपस्थित केले जातात. असो, १९८० पासून आदिवासी लिखित साहित्य गतिमान झाल्याचे दिसते. आज आदिवासी साहित्य ही संकल्पना बहुरूढ झाली आहे. हे साहित्र्य सर्वत्र आणि सर्वदूर चर्चिले जात आहे. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच विद्यापिठांमध्ये आदिवासी साहित्याचा अभ्यास केला जात आहे. त्याशिवाय शालेय पाठ्यक्रमातही आदिवासी जीवन चित्रित करणारे धडे, उतारे आणि प्रकरणांचा समावेश करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी जीवन, संस्कृती, भाषा, इतिहास, संघर्ष, स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, आदिवासी शूर- वीर वीरांगना आणि त्यांची श्रमसंस्कृती इत्यादी विषयाचा यांचा खरा इतिहास सर्वसामान्यांना किमान माहित होऊ लागला.

3. संशोधनाचे महत्व

‘सर्वांना समान वाटा’ अशी मुलभूत धारणा असलेली आदिवासी श्रमसंस्कृतीची तत्त्वप्रणाली आजही अनेकांना श्रेष्ट वाटते. त्यांच्यात ‘तोंड बघून’ व्यवहार केले जात नाहीत. स्त्री-पुरुष समानता आणि सर्वांसाठी समान कायदा यांसारख्या न्यायप्रणालीमुळे त्यांच्या संस्कृतीत मानवी मूल्यांचा आदर केला जातो.

मानवतावादी दृष्टीकोन जोपासला जातो. अन्न व श्रमाइतकेच नृत्य व संगीतालाही ते महत्व देतात. त्यांच्यात शारीरिक श्रमाची विभागणी व्यक्तीच्या कुवतीप्रमाणे व वयाप्रमाणे केली जाते. त्यांची ही श्रम विभागणी केवळ उपजीविकेपुरती सीमित नाही, तर नृत्यादी कलाविष्काराच्या दृष्टीने देखील परिपूर्ण आहे. त्यांचे श्रम हे प्रामुख्याने कृषिजीवनाशी निगडीत आहेत. दिवसभर प्रपंचार्थी केलेला थकवा हलका करण्यासाठी ते नृत्य-गाण करतात, त्यांच्या या शारीरिक कृतीला "श्रमसंस्कृती" असे म्हणता येते.

आदिवासींच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्याला माणूस म्हणून जगण्याचा आधिकार मिळावा, त्यांच्या श्रमाची कदर व्हावी आणि त्याचे महत्व कळावे. या उद्देशाने सदर विषय विवडण्यात आला आहे.

4. संशोधनाचे प्रयोजन

'आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती' च्या संदर्भाने विचार करत असताना प्रथमतः आदिवासी समाज वास्तव काय आहे हे थोडक्यात समजून घेणे हे मुख्य प्रयोजन आहे. आदिवासी हे पृथ्वीतलावरील 'मुळनिवासी' म्हणून ओळखले जातात. त्यांची संस्कृती, भाषा, कला, विविध आविष्कार, नैसर्गिक जीवनपद्धती इ.वैशिष्ठ्यांवरून आदिवासींचे प्राचीनत्व सिद्ध होण्यास पुष्ठी मिळते. त्यांच्या सामाजिक जीवनातील आदिमतत्व किंवा आदिबंध, विश्वबंधुता, निसर्ग आणि स्त्री-पुरुष समानता इत्यादींमुळे आदिवासींच्या जीवनमूल्यांचे वेगळे दर्शन घडते. मौखिक परंपरेतून चालत आलेल्या त्यांच्या लोकसंस्कृतीमधून मानवी मूल्यांचे वेगळे दर्शन घडते. त्यांची लोकतत्वे जशी निसर्ग पूजक आहेत तशी व्यक्तीपुजकही आहेत. या मूलभूत तत्वांच्या आधारेच साठोत्तरी आदिवासी साहित्याची निर्मिती झाली. विविधप्रकारच्या लोकतत्वांधारे आदिवासींनी आपला स्वतंत्र व मूळप्रवाह जतन करत आला आहे. त्यांच्या मौखिक तथा लिखित साहित्यात जागोजागी ही तत्वे आढळून येतात. फुले-आंबेडकरांनी आर्य-अनार्यांच्या द्वंद्वांची चिकित्सा करणारा जो बुद्धिवाद मांडला. तो बुद्धिवाद आदिवासी साहित्यानेही स्वीकारला आहे. आदिवासी शारिरीक श्रम अथकपणे करतो. त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे हे संशोधनाचे प्रयोजन आहे.

5. संशोधन विषय निवडीचा हेतू

आदिवासी श्रमसंस्कृतीवर फारशे संशोधन झाले नसल्याचे लक्षात आले, त्यामुळे सदर विषय निवडण्याचा हेतू आहे. आदिवासी साहित्यनिर्मिती ही मराठीतून झाली आहे. त्याशिवाय गौंडी, कोया, भिल्ली, परधानी, कोरकू, कोलामी, कोळी, वारली, अशा विविध बोली भाषांमध्येही आदिवासी साहित्य लिपीबद्ध झाल्याचे दिसते.

दीर्घकाळ औपचारिक शिक्षणापासून वंचित असल्यामुळे किंवा त्याप्रकारच्या शिक्षणाची गरज न भासल्यामुळे आदिवासी 'लिपी' किंवा लेखनला महत्व दिला नाही. त्यामुळे त्यांच्या बहुतांश बोलीभाषांना लिपी नाही. लिपी नसल्यामुळे त्यांच्यात लेखन परंपरा नाही. याचा अर्थ त्यांना शिकण्याची किंवा लिहिण्याची मुळीच इच्छा नव्हती असे नाही, तर त्यांना येथील समाज व्यवस्थेने माणूस म्हणून कधीच स्वीकारले नाही. आदिवासी विलक्षण बुद्धिमान, प्रतिभावंत होते, आहेत. पण त्यांची इथल्या व्यवस्थेने कधी दखलच घेतली नाही. ज्यांनी स्वबळावर कौशल्य संपादन केले; त्यांचा कधी अंगठा छाटण्यात आला, तर कधी त्यांचे उपरोध, अवहेलना केले गेले. त्यामुळे आदिवासींचा खरा इतिहास जगासमोर आलाच नाही.

6. संशोधनाचे उद्दिष्टे

'नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास' (निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा) या विषयावर संशोधन करण्याच्या हेतूने खालील उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.

1. आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृतीच्या शोध घेणे.
2. आदिवासी साहित्यातील समाज जीवन आणि श्रम भावना याबाबींचा तपशीलाने शोध घेणे.
3. आदिवासी समाज केवळ शारिरीक श्रमालाच अधिक प्रतिष्ठाणेच्या कारणांचा शोध घेणे.
4. आदिवासी कवितेतील श्रमसंस्कृती जीवनाचे चित्रण वास्तव पातळीवर चित्रण आधोरेखित करणे.
5. आदिवासी कथेतील श्रमसंस्कृतीचा वास्तवाशी येणाऱ्या संबंधाने अभ्यास करणे.
6. आदिवासी कांदबरीतील श्रमसंस्कृतीचा आदिवासी वास्तव जीवनाशी येणारा संबंधाचा शोध घेणे.
7. आदिवासी आत्मकथेतील श्रमसंस्कृतीचे वेगळेपण अधोरेखित करणे.

7. संशोधनाची गृहितके

'नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास' (निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा) या विषयावर संशोधन करताना खालील गृहितके समोर ठेऊन संशोधन करण्याचा मनोदय आहे.

1. आदिवासी समाज श्रमावर आधारित जीवन जगतो.
2. आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती ही परंपरागत आहे.

3. आदिवासी साहित्यातून श्रम व श्रमिक जीवन बदलत गेले आहे.
4. आदिवासी साहित्य व श्रम यांचा संबंध अविभाज्य आहे.
5. आदिवासी साहित्यात मानवी सामाजिक, आर्थिक, राजकिय व सांस्कृतिक, मुल्य सकारात्मक साकारलेली आहेत.

6. संशोधन पध्दती

'नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास' (निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा) या विषयावर संशोधन करताना ग्रंथालयाचा वापर संदर्भ ग्रंथाचे वाचन, तळा-टिपा काढण्यासाठी व अभ्यासाठी करुन प्रकरणाची मांडणी, लेखन करीता करण्याचा उद्देश आहे. त्याच बरोबर दैनिके, नियतकालिके, ई-बुक इत्यादी साधनने संशोधन करना हाताळली व अभ्यासली जाणार आहेत.

7. संशोधनाचा प्रकरण आराखडा

'नव्वदोत्तरी आदिवासी साहित्यातील श्रमसंस्कृती : एक अभ्यास'
(निवडक कथा, कविता, कादंबरी आणि आत्मकथा)

प्रकरण पहिले	**आदिवासी साहित्य आणि संकल्पना**
प्रकरण दुसरे	**आदिवासी कवितेतील श्रमसंस्कृतीचे चित्रण**
प्रकरण तिसरे	**आदिवासी कथेतील श्रमसंस्कृती**
प्रकरण चौथे	**आदिवासी कांदबरीतील श्रमसंस्कृती**
प्रकरण पाचवे	**आदिवासी आत्मकथेतील श्रमसंस्कृती**
प्रकरण सहावे	**उपसंहार आणि निष्कर्ष**

8. संदर्भग्रंथ

1. संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, डॉ. आगलावे प्रदीप
2. मराठी साहित्य संशोधान स्वरूप व समस्या, डॉ. राणे श. रा.
3. संशोधन पध्दती, डॉ. पाटील वा. भा.
4. महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध, गावित माहेश्वरी
5. आदिवासी साहित्य : शोध आणि समिक्षा, मडावी बाबाराव
6. परीवर्तनवादीवैचारिक वादळ : बाबाराव मडावी, कांबळे चिंतामन (संपा)
7. आदिवासी साहित्यविचार, गाविद माहेश्वरी

सदर संशोधन कार्यासाठी खालील निवडक साहित्यांचा समावेश असेल.

कथा

1. ताडमं, सरकुंडे माधव
2. भाकर, मदावी बाबाराव
3. नवसा भिलणीचा एल्गार, गावीत नजिबाई

कविता

1. गोधड, सोनवने वारू
2. उलगुलान, मेश्राम भुंजग
3. म्होरकी, आत्राम उषाकिरण

कादंबरी

1. वाडा, सरकुंडे माधव
2. भिवा फरारी, गावीत नजुबाई
3. टाहो, मडावी बाबाराव

आत्मकथा

1. आदोर, गावीत नजुबाई
2. आकांत, मडावी बाबाराव
3. उघडा दरवाजा, आत्राम रामराजे

संशोधन मार्गदर्शक

डॉ. वैजनाथ अनमुलवाड

नेट, पीएच. डी. (मराठी)
भाषा, वाङमय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधक

समता विद्यासागर भुताळे